

# मुस्लिम समाजातील राजकीय विचारवंत व मुस्लिम समाजाच्या विकासासाठी प्रशासनाची भूमिका


संपादक

डॉ. नितीन एन. आहेर

प्रा. वैशाली एस. पेरके

... Role — Dr. Mohd. Umar

24) National Mov... of Maulana A... — Dr. Shubhangi Rathi 86
25) Maulana Azad as the first Education Minister of India — Mr. Shaikh Faruk Ismail 90
26) Educational Thoughts of Dr. Zakir Hussain — Prof. Sutawane Parimal Arvind 93
27) Azad's Efforts in Shaping The Education Policy — Mr. Laxman Ghotekar, Mr. Abasaheb Gaikwad 95
28) Sir Sayed Ahmad Khan — Prof. Wahida Shaikh 100
29) Dr. Zakir Husain — Prof. Shubana Shaikh 105
30) A.P.J. Abdul Kalam Visionary Leader — Prof. Mayur Gaikwad 109


# लोकप्रशासन

## १ विषय : मुस्लिम महिला आणि स्वयंसहाय्यता गट


१) Muslim Women and Educational Challenges — Dr. Ms. Seema Nikalje ११८
२) मुस्लिम समाजाच्या विकासात स्वयंसहाय्यता गटाची (बचत गटाची) भूमिका — डॉ. बी. आर. कत्तुरवार १२३
३) मुस्लिम महिला आणि स्वयंसहायता गट — प्रा. राणी जाधव-गायकवाड १२४
४) मुस्लिम महिला व स्वयंसाह्यता गट — प्रा. प्रतिभा विष्णू आघार्डे १२९
५) मुस्लिम महिला आणि स्वयंसाह्यता गट — प्रा. गौरव गोविंदराव जेवळीकर १३३


## २ विषय : मध्ययुगीन मुस्लिम राज्यवटीतील प्रशासनव्यवस्था


6) मध्ययुगीन मुस्लिम प्रशासन व्यवस्था — डॉ. प्रतिभा पाटील, श्री. अंबादास आरगडे १३६
७) अकबर की प्रशासनिक नितियाँ — डॉ. प्रतिभा उन्हाळे १४२
८) ADMINISTRATION OF THE MUGHALS IN ANCIENT INDIA — Dr. Sudhir Prakashrao Dinde 145
९) मध्ययूगीन मुस्लिम राजवटीतील प्रशासन — डॉ. कल्पना हनुमंतराव घारगे १४९
१०) मध्ययुगीन मुस्लिम राजवटीतील प्रशासन — प्रा. सिमा विजयराव काशीद १५२
११) मध्ययुगीन भारतीय आदर्श प्रशासन व्यवस्थेचा निर्माता : सम्राट अकबर — प्रा. भालेराव जे. के. १५५
१२) मध्ययुगीन मुस्लिम राजवटीतील प्रशासन — प्रा. गजानन देवराव चिट्टेवाड १५९
१३) मध्ययुगीन मुस्लिम राजवटीतील मोगलकालीन प्रशासन — प्रा. रमेश वाघमारे, प्रा. संजय कांबळे १६२
१४) मध्ययुगीन मुस्लिम राजवटीतील प्रशासन — प्रा. बबन परसराम आमले १६६
15) The Administrative Policy of Akbar — Prof. Hanuman. M. Wankar 169
१६) मध्ययुगीन मुस्लिम राजवटीतील प्रशासन — प्रा. संतोष पी. गुट्टे १७३
१७) मध्ययुगीन मुस्लिम राजवटीतील प्रशासन — प्रा. एन.पी. कुडकेकर १७७

# मुस्लिम महिला आणि स्वयंसहायता गट

प्रा. राणी जगन्नाथराव जाधव-गायकवाड
गृहविज्ञान विभागप्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर, गढी, ता.गेवराई, जि.बीड

**गोषवारा (Abstract)**

आज सर्वच स्तरातील महिलांना संघटीत करण्यासाठी त्यांना विकासात्मक स्वरूपाचे शिक्षण देण्यासाठीचे माध्यम म्हणजे स्वयंहायता समुह होय. मुस्लीम समाजासारख्या अल्पसंख्यांक समाजातील महिलांचा सर्वांगीण व्यक्तीमत्व विकास घडवून आणण्यासाठी स्वयंसहायता समुहाची भूमिका महत्वाची आहे. स्वयंसहायता समुहामुळे या महिलांमध्ये आर्थिक स्वावलंबन, आत्मविश्वास, आर्थिक व्यवहार करणे, नेतृत्वगुणांचा विकास, व्यवस्थापन कौशल्य इ. गोष्टींबरोबरच कौटुंबिक स्वास्थ्य सांभाळून मानसिक समाधान प्राप्त करण्याची भूमिका निर्माण झाली आहे. शिलाई, दुग्ध व्यवसाय, लोणचे, पापड, मसाले तयार करणे. कटपीस, पार्लर, कुक्कुटपालन, शेळी पालन, खाद्य पदार्थ स्टॉल इ. प्रकारचे लघु उद्योग गृह उद्योग, मुस्लीम महिला करताना आढळून येत आहेत. स्वयंहायता समुहाचे सदस्य झाल्यामुळे स्वच्छता अभियान, सार्वजनिक ठिकाणी जनजागृती कार्यक्रम, निवडणूकात उमेदवार व मतदान, कुटूंबातील आर्थिक व इतर निर्णयात सहभाग इ. मध्ये मुस्लीम महिलांचा उल्लेखनीय सहभाग वाढला आहे ही या महिलांची आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाकडील वाटचाल आहे.

**प्रस्तावना :-**

स्त्री आणि पुरूष ही विकासरथाची दोन चाके मानली जातात. पण आपल्या देशात महिलांकडे कायम अबला म्हणून पाहण्यात आले. तिचे क्षेत्र केवळ चूल आणि मूल इथपर्यंत सीमीत ठेवण्यात आले. त्या कौटुंबिक आत्याचाराला कायम बळी पडत आल्या आहेत. महिलांना अजूनही मुख्य प्रवाहाचा घटक मानला जात नाही. कोणतेही राष्ट्र आर्थिक प्रगती साधत असताना महिलांकडे दुर्लक्ष करू शकत नाही. इतर समाजातील महिलांबरोबरच मुस्लीम समाजातील महिलांची स्थीती पाहता आपणास असे दिसते की खेड्यातील बहुतांश महिला अद्याप निरक्षरतेच्या ओझ्यापासून मुक्त होवू शकलेल्या नाहीत. ग्रामीण भागात भूमीहीन महिलांची संख्या लक्षणीय आहे. शेतातील कामे, जनावरे सांभाळणे, मुलांची देखभाल, स्वयंपाक, लाकूड फाटा आणणे, साफ सफाई इ. कामात महिला अडकलेल्या दिसतात. बेरोजगारी, कमी शिक्षण, अर्थाजनासाठी आवश्यक अशा कौशल्याचा अभाव, मुस्लीम समाजातील पारंपारिक समजुतीमुळे घराबाहेर जावून काम करण्यावर मर्यादा, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव या आणि अनेक विविध अडचणींचे डोंगर या महिलांच्या मार्गात आहेत. त्यामुळेच महिलांच्या सक्रिय सामाजिक सहभागावर मर्यादा आल्याचे आढळून येते. कुटूंबाचा आर्थिक व सामाजिकस्तर उंचावण्याच्या दृष्टीने साक्षरतेचे महत्व निर्विवाद आहेच परंतु आर्थिक बाबीचे नियंत्रण हातात येत नाही तोपर्यंत मुस्लीम महिलांना व त्यांच्या कल्याणासाठी असणा-या विविध उपक्रमांना बळ प्राप्त होणार नाही. रविंद्रनाथ टागोरांनी म्हटले आहे "Woman is the builder and moulder of the nation" त्यामुळेच महिला सक्षमीकरण ही एक व्यापक संकल्पना अस्तित्वात आली आहे. यातूनच महिलांची आर्थिक उन्नती साधण्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाची अशी स्वयंसहायता बचतगट चळवळ पुढे आली आहे.

**स्वयंसहायता गटाचा इतिहास :-**

महिला स्वयंसहायता गटाची सुरूवात आशिया खंडातील गरीब समजल्या जाणा-या बांग्लादेशात झाली. अर्थतज्ञ प्रा.डॉ.महंमद युनूस हे बचतगट संकल्पनेचे प्रवृर्तक मानले जातात. सन 1970 साली बांग्लादेशात त्यांनी पहिल्या बचतगटाची स्थापना केली. दारिद्र्य निर्मुलनात स्वयंरोजगार महत्वाचा घटक ठरू शकतो. या तत्वावर भर देवून अनौपचारिक पद्धतीने सुक्ष्म पातळीवर वित्तपुरवठ्याचा विचार मांडून व त्यातून कमकुवत वर्गाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्वयंसहायतागट हे प्रभावी माध्यम ठरले. महाराष्ट्रात स्वयंसहायता गटाची स्थापना प्रथमत: 'सुधाताई कोठारे' यांनी केली. पुढे 1 एप्रिल 1999 पासून सुवर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजना सुरू करण्यात आली याच्या अंमलबजावणीसाठी स्वयंसहायता गटाची स्थापना करून या गटांना बँके मार्फत कर्ज देवून शासनामार्फत अनुदान देवून सहायता करण्यात आली.

**स्वयंसहायता गटाची व्याख्या :-**

स्वयंसहायता गटाची चळवळ जगभरामध्ये लघु-वित्त गट, बचतगट, शेजारगट, स्वयंसहायता समूह, सेल्फ हेल्प ग्रुप,

महिला बचतगट या वेगवेगळ्या ...
व्याख्या पुढील प्रमाणे.

1) 'परावलंबनाकडून स्वावलंबनाकडे आपल्याच स्वेच्छेने सामुदायिकपणे बचतीच्या माध्यमाने केलेला प्रवास म्हणजे स्वयं
समूह होय.'

2) 'आपल्या सुचीतील काटकसरीद्वारे बचत करून यांद्वारे सभासदांना गरजेनुसार कर्ज देणे, कर्जाची परतफेड
व्यवसाय करणे, वित्तीय संस्थाकडून कर्ज उभारणी करणे, उत्पादनासाठी सामुहिक व वैयक्तीक उद्योग निर्माण
सर्व सदस्य आत्मनिर्भर बनविणे अशा समुहास स्वयंसहाय्यता गट असे म्हणतात.'

**अध्ययन विषयाचे महत्व :-**

स्त्री आणि पुरुष ही समाजाची महत्वाची अंग असले तरी दोन्हींचा समतोल विकासाचा विचार केला असता एक
स्पष्ट आहे ती म्हणजे स्त्रीच्या विकासाला म्हणावी तितकी चालना दिली गेली नाही व आर्थिक सामाजिक व राजकीय स्वातंत्र्या
त्यांना हेतूपुरस्सर दुर ठेवले गेले. कारण कांहीही असोत स्त्रीयांची तुलना शुद्रांशी केली गेली. स्त्रीयांमध्येही मुस्लीम समाज
स्त्रीयांची स्थिती आणखीनच दयनीय आहे. स्वयंसहाय्यता समुह म्हणजे केवळ आर्थिक उन्नती हा दृष्टीकोन समोर न
स्त्रीयांच्या विकासासाठी त्यांना शिक्षण देवून त्यांचे समाजातील स्थान उंचावण्यासाठी स्वयंसहायता समुहाची स्थापना केली
स्त्रीयांच्या विकासासाठी महात्मा ज्योतिबा - सावित्रीबाईंनी केलेले कार्य भरीव व दिशा देणारे ठरले आहे. मुस्लीम समाज
स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोन आजही म्हणावा तितका सन्मानजनक नाही आजही मुस्लीम समाजातील स्त्रीयांना स्वयंस
गटाच्या माध्यमातून काम करत असताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. शासन विविध शासकीय योजनाद्वारे महिल
उन्नतीसाठी प्रयत्न करत आहे. शासकीय धोरणाव्यतिरिक्त स्वयंसहायता गट स्वतंत्ररित्या अनेक लघुउद्योग व्यवस्थित व यशस्वी
पार पाडत आहेत. स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून मुस्लीम महिलांचे ख-याअर्थाने सक्षमीकरण होत आहे किंवा नाही याचा
घेण्यासाठी प्रस्तुत विषयाचे संशोधन करण्यात आले आहे.

**अध्ययनाचे उद्देश :-**

1) स्वयंसहायता गटात कार्य करणा-या मुस्लीम महिलांच्या विविधांगी सक्षमीकरणाचा अभ्यास करणे.
2) मुस्लीम समाजातील महिलांच्या समस्यांचा अभ्यासकरणे.
3) कौटुंबिक उत्पन्नात भर पडून दारिद्र्य निर्मुलनासाठी स्वयंसहायता गट सहय्यकारी ठरले का ? याचा अभ्यास कर

**अध्यनाचे गृहीतकृत्ये :-**

1) स्वयंसहायता समुहामुळे मुस्लीम महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होवून त्या ब-याच प्रमाणात आत्मनिर्भर झा
आहेत.
2) स्वयंसहायता समुहामुळे मुस्लीम समाजात स्त्रीविषयक पारंपारिक दृष्टीकोन बदलत आहे.

**संशोधन पद्धती :-**

मुस्लीम समाजातील महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाचा अभ्यास करण्यासाठी बीड शहरातील काही निवडक भा
निवड करण्यात आली. यासाठी संभाव्य निवड पद्धतीद्वारे 15 महिला स्वयंसहायता समुहाची निवड करण्यात आली.

**तथ्यसंकलनाचे स्त्रोत :-**

प्रस्तुत विषयाच्या संशोधनाकरिता प्राथमिक स्त्रोतातील अनुसूची तंत्राचा वापर करण्यात आला. यात प्रत्यक्ष मुलाख
व निरिक्षणाद्वारे प्राथमिक माहीती घेण्यात आली. द्वीतीयक माहितीसाठी मासिके व दैनिक वृत्तपत्राचे अध्ययन करण्यात अ

प्रस्तुत विषयांचे संशोधनात एकूण 15 स्वयंसहायता समुहापैकी 2 स्वयंसहायता गट बंद पडण्याच्या मार्गावर आहेत
स्वयंसहायता समुह चांगल्या प्रकारे कार्य करत असलेले आढळून आले. या स्वयंसहायता गटाच्या अध्ययनाद्वारे संकलीत झा
माहिती निष्कर्षाच्या स्वरूपात पुढील प्रमाणे मांडता येईल.

**निष्कर्ष :-**

1) स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून विविध कौटुंबिक पार्श्वभूमी असलेल्या मुस्लीम समाजातील महिला संघटीत झा
आहेत.
2) मुस्लीम महिला स्वयंसहायता समुहाच्या माध्यमातून अनेक नवीन लघुउद्योगाची व रोजगारांची निर्मिती करत आहे
3) मुस्लीम महिलांमध्ये अंगभूत असणा-या कौशल्य व सुप्त गुणांचा व क्षमतांचा विकास होण्यासाठी स्वयंसहायता स

सहाय्यभूत ठरत आहेत.

स्वयंसहायता समुहात कार्य करत असल्यामुळे मुस्लीम महिला आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झाल्या आहेत.

दारिद्र्य निर्मुलनासाठी या महिलांना स्वयंसहायता समुहाची मदत होत आहे.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ मुस्लीम महिला स्वयंसहायता गटाच्या माध्यमाने घेत आहेत.

स्वयंसहायता समुहामुळे मुस्लीम महिला आत्मविश्वासाने घराबाहेर वावरत आहेत आणि त्यांच्या कुटूंबात त्यांच्याकडे सन्मानाने पाहिले जात आहे.

मुस्लीम महिला कुटूंबातील एखाद्या मोठ्या कार्यक्रमासाठी किंवा उद्योगासाठी स्वयंसहायता समुहाच्या माध्यमाने कर्जउपलब्ध करून देत आहेत.

महिलांच्या संघटनामुळे मुस्लीम महिला एकमेकांच्या अडचणीच्या काळात मदत करतात.

0) मुस्लीम महिलांमध्ये स्वयंसहायता समुहामुळे योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसीत झालेली आहे.

1) मुस्लीम महिला स्वयंसहायता गटाद्वारे जीवन सुरक्षा विमा योजनेचा फायदा घेत आहेत.

2) स्वयंसहायता गटाच्या स्थापनेपासून मुस्लीम महिला सामाजिक कार्यात सहभागी होत अहेत. पूर्वी घराच्या आत पडद्यामागे राहणा-या महिला आज दारूबंदी, तंटामुक्ती किंवा कॉलनीतील काही समस्याच्या निमित्ताने सामाजीक कार्यात सहभाग घेत आहेत.

3) स्वयंसहायता समुहाच्या माध्यमातून मुस्लीम महिला चांगल्याप्रकारे व्यवस्थापन करून एकमेकांच्या विचार विनीमयाने उत्तमप्रकारे कार्य करत आहेत.

4) स्वयंसहायता समुहाच्या माध्यमातून करत असणा-या उद्योग व त्याचा विस्तार पाहून मुस्लीम महिलांमध्ये महत्वाकांक्षा आली आहे.

5) स्वयंसहायता समुहात काम केल्यामुळे मुस्लीम महिलांमध्ये जागरूकता आली असून त्यांच्यातील न्युनगंड निघाला असून कल्पनाशक्तीला वाव मिळाला आहे.

6) मुस्लिम महिलाना आपणही काहीतरी करू शकतो हा आशेचा किरण त्यांच्यात आला आहे. आरोग्य जागृती निर्माण झाली आहे.

7) स्वयंसहायता समुहामुळे मुस्लिम महिलांना विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे त्यामुळे मानसिक आरोग्य सुधारले आहे.

**मूल्यमापन :-**

वरील निष्कर्षावरून मुस्लिम महिलांचा विविधांगाने विकास होत आहे त्या विविध योजनांचा फायदा घेत आहेत. हे जरी दिसून येत असले तरी शासनाच्या काही योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांना ब-याच अडचणींना सामोरे जावे लागते. काही योजनांची माहिती या महिलांपर्यंत ब-याच उशिराने पोहचते किंवा कधी कधी योजना अधिका-याच्या अयोग्य मार्गदर्शनामुळे या महिलांना योजनांचा लाभ घेता येत नाही अशा काही समस्या जर दुर झाल्या तर स्वयंसहायता गट चांगल्याप्रकारे काम करू शकेल. एकुण अध्ययनावरून असे म्हणता येईल की, स्वयंसहायता समुहामुळे मुस्लीम महिलांना आपले समाजातील स्थान उंचावण्यासाठी व व्यक्तीमत्व विकासासाठी कौटुंबिक विकासासाठी चांगलाच फायदा होत आहे. संशोधनातील कार्यरत नसलेले दोन स्वयंसहायता समुहाचे अध्ययन केले असता असे आढळून आले की या समुहातील महिलांना मार्गदर्शन व्यवस्थित झाले नाही. या समुहातील महिलांचे व्यवस्थापन अयोग्य पद्धतीचे होते. वेळेवर पैसे न भरणे किंवा बैठकांना अनुपस्थितीत राहणे, कौटुंबिक जबाबदारीमुळे स्वयंसहायता समुहासाठी वेळ देता न येणे असे प्रकार आढळून आले. यामुळे या गटातील महिलांना योग्य मार्गदर्शन झाले त्यांच्या कौटूंबिक समस्यावर आपसात विचार विनिमय करून काही तोडगा काढता आला तर हे समुह चांगल्या प्रकारे काम करू शकतील.

**संदर्भस्त्रोत :-**

1) रमेश बालवाड - बचतगटातून समृद्धीकडे - विद्याभारती प्रकाशन.

2) राजेश चौधरी - महिला बचत गट हस्तपुस्तीका - चौधरी लॉ पब्लिशर्स जळगाव-पुणे.

3) लोकराज्य - 2008.

4) मनीषकुमार - महिला सशक्मीकरण - दशा और दिशा दिल्ली - मधुर बुक्स.

5) महिलांचे सबलीकरण दारिद्र्य निर्मुलन व स्वयंसहायता गट - प्रकाशन य.च.म.मु.विद्यापीठ नाशिक सो-32.

6) दैनिक लोकसत्ता दि.28.08.2010.

❐❖❐